समरगीतांची ललकार...

सध्या इराकवर अमेरिकेने लादलेल्या युद्धाकडे सगळ्या जगाचं लक्ष लागलं आहे. या युद्धाच्या पार्श्वभूमीवर हिंदी चित्रपटांत लोकप्रिय ठरलेली काही समरगीतं...

□ अजित पोपट

'देखो वीर जवानों अपने खून पे ये इल्जाम न आये
मां न कहे के बेटे मेरे वक्त पडे तो काम न आये...
हम पहले भारतवासी फिर हिन्दु मुस्लिम शीख इसाई
नाम जुदा है तो क्या भारत मां के सब बेटे है भाई
अब्दुल उसके बच्चे पाले जो घर वापस राम न आये –
देखो...
अंधा बेटा युद्ध को चला तो 'न जा' उसकी मां बोली
वो बोला, 'कम कर सकता हू मैं दुश्मन की एक गोली...'
जिक्र शहीदों का हो तो क्यों उस में मेरा नाम न आये –
देखो...

या गीताचे बोल लक्षपूर्वक वाचा. त्यातही दुसऱ्या अंतऱ्यात तर कमालच केली आहे. एका अंध मुलाला त्याची आई युद्धावर जाण्यापासून परावृत्त करतेय. पण तो आईला सांगतो की निदान अंगावर शत्रूची एक गोळी घेऊन मी त्यांची ताकद तेवढी कमी करू शकतो. शिवाय त्यामुळे शहीद होण्याचा सन्मान त्याला मिळणार तो वेगळाच!

गीताचे बोल वाचताना तुम्हाला ते प्रदीपजी किंवा प्रेम धवन यांचं असल्याचा दाट संशय येईल. कारण त्या दोघांच्या नावावर अधिक युद्धगीतं आहेत. पण हे गीत लिहिलंय आनंद बक्षी यांनी.

जे. ओम प्रकाश दिग्दर्शित *आक्रमण* (१९७५) चित्रपटासाठी त्यांनी हे गीत लिहिलं. आणीबाणीच्या काळात अनेक चित्रपटांना सेन्सॉरने कात्री लावूनही हे गीत मात्र खूपच लोकप्रिय झालं होतं. अशोककुमार, संजीवकुमार, राकेश रोशन आणि पाहुणा कलाकार म्हणून राजेश खन्ना यातील महत्त्वाचे कलाकार होते. या चित्रपटाविषयी बोलताना एकदा दादामुनी म्हणाले होते की, १९४७ पूर्वी ब्रिटीश सरकारची सेन्सॉरशिप असायची; पण १९७५साली आपल्याच सरकारच्या सेन्सॉरशिपला चित्रपट सामोरे जात होते. एक सरकारी अधिकारी *आक्रमण*विषयी बोलताना म्हणाला होता, 'यह क्या बकवास है? इंडियन आर्मी में अंध जवानों की भर्ती नही करते...' मग आपलं नेहमीचं गडगडाटी हास्य करत दादामुनी म्हणाले, 'त्या मूर्खाने गीताचा शब्दशः अर्थ काढला. त्याला त्यामागची भावना नाही दिसली. याला म्हणतात सरकारी वागणं...!' आणि हो, हे युद्धगीत किशोरकुमारने गायलं होतं, संगीतकार होते लक्ष्मीकांत प्यारेलाल.

आजचा विषय आहे सैन्यातील जवानांना प्रेरणादायी ठरणारी हिंदी चित्रपटांतली समरगीतं. इराकवर अमेरिकेने केलेल्या हल्ल्यामुळे जगभर युद्धाचं वातावरण आहे. त्यामुळे भारताशी जोडलेल्या युद्धाच्या अनेक आठवणी आणि त्यानिमित्ताने बनवण्यात आलेले चित्रपट नजरेसमोर तरळून गेले. आजही देशभक्तीपर गीतांविषयी आपण आदराने बोलतो. आपल्या चित्रपटगीतांत त्यांचं अनन्यसाधारण महत्त्व आहे. गेल्या ५०-६० वर्षांत आवर्जून उल्लेख करता येतील अशी जेमतेम पन्नासेक गीतं आपल्याला सापडतील.

मराठीत एक सुंदर युद्धगीत आहे. त्यात उल्लेख केलेला शत्रू वैश्विक आहे म्हणा ना. गीताचे बोल आहेत–


माणुसकीच्या शत्रूसंगे युद्ध आमुचे सुरू
जिंकू किंवा मरू जिंकू किंवा मरू...


किती सुंदर भावना आहे. जो जो माणुसकीच्या विरोधात जाऊन वर्तन करेल तो प्रत्येकजण आपला शत्रू आहे आणि त्याच्या विरोधात लढणं हे आपल्यापैकी प्रत्येकाचं कर्तव्य आहे. या लढाईत आपण प्राणपणाने लढणार आहोत असं आवाहन कवीने लोकांना केलं आहे.


अर्थात या लेखात आपण हिंदी चित्रपटातील युद्धगीतांचा उल्लेख करतोय. १९४८मध्ये रणजीत स्टुडियोने *परदेसी मेहमान* नावाचा एक चित्रपट बनवला होता. त्याची कथा ब्रिटिश शासनाविरुद्ध भारतीयांनी पुकारलेल्या स्वातंत्र्यसंग्रामावरच बेतलेली होती. कमल कपूर (ज्यांनी नंतर मनोजकुमार किंवा अमिताभ बच्चनच्या चित्रपटात इंग्रज अधिकाऱ्याच्या भूमिका साकारल्या.), बिपिन गुप्ता, हुश्नबानू वगैरे कलाकार त्यात होते. पंडित इंद्रजींनी लिहिलेल्या गीताला हंसराज बहलनी संगीत दिलं होतं. ते गीत कोणी गायलं असेल? महम्मद रफी? मन्ना डे? हेमंतकुमार? नाही. ते हृदयद्रावक गीत गायलं होतं मुकेशने. गीताचे बोल होते:


होशियार नवजवां, जाग ओ नवजवां
जल रहा तेरा मकां जल रहा हिन्दोस्तां,
जल रहा है आशियां, उजड रहा है गुलसितां
रो रहा है बागबां मुस्कुरा रही फिझां...

दिग्दर्शक अस्पींना मुकेशने आपल्यासाठी गावं असं नेहमी वाटायचं. म्हणून हंसराज बहलना त्यांनी हे गीत मुकेशकडून गाऊन घेण्याची



प्रदीपजी


अंजान



भरत व्यास


रवी


गीता दत्त


आनंद बक्षी


मुकेश


सी. रामचंद्र

गळ घातली आणि मुकेशनेही ते मनापासून गायलं.

असंच एक सुंदर गीत हंसराज बहलनी १९५१ मध्ये प्रदर्शित झालेल्या कमल कपूर, तिवारी, अल नझीर, गोविंदाचे वडील अरुण आणि बद्रीप्रसाद अभिनीत *कश्मीर* चित्रपटात गायलं होतं. महंमद रफी, गीता दत्त आणि कोरसच्या आवाजातल्या त्या गीताचे बोल होते–

उठ अय वतन के नवजवां
आया है वक्ते इम्तेहां
मैदान मैं चल...

या दोन्ही गीतांच्या अगोदर १९४७मध्ये मराठी संगीतकार दत्ता डावजेकर यांच्या संगीतात *आप की सेवा में* नावाच्या चित्रपटातलं प्रदीपजींचं एक गीत होतं–

'देश में संकट आया है अब कुछ करके दिखलाना है...'

स्वातंत्र्यानंतरच्या दोन-तीन वर्षांत स्वातंत्र्यसंग्रामावर दोन-तीन चित्रपट बनले होते. रमेश सहगल दिग्दर्शित आणि दिलीपकुमार अभिनीत *शहीद* चित्रपटात शशी कपूरने बाल कलाकार म्हणून काम केलं होतं. त्यातलं राजा महेदी अली खांनी लिहिलेलं एक गीत आजही लोकप्रिय आहे. पंजाबी ठेका असलेल्या या गीताला गुलाम हैदर यांनी चाल दिली होती. महंमद रफी आणि कोरसने गायलेलं ते गीत होतं–

'वतन की राह में वतन के नौजवां शहीद हो...
पुकारते है ये जमीं- ओ आसमां शहीद हो...'

भारतीय शास्त्रीय संगीतात मियां तानसेनच्या नावावर जे राग आहेत उदा. मिया की मल्हार, मियां की तोडी वगैरे. तर यातला मियां की तोडी सकाळचा राग आहे. त्यातही मोजकी दोन-चार गाणी आहेत. युद्धाच्या पार्श्वभूमीवर बेतलेलं एक गीत *फूल बने अंगारे*(१९६३) साठी आनंद बक्षींनी लिहिलं होतं. कल्याणजी-आनंदजींनी त्याला संगीत दिलं होतं. महंमद रफींच्या आवाजातलं ते हृदयंगम गीत होतं–

वतन पे जो फिदा होगा, अमर वो नवजवां होगा,
रहेगी जब तलक दुनिया, ये अफसाना बयां होगा...

याऽ हू छाप शम्मी कपूर अभिनीत *महारानी* या चित्रपटासाठी संगीतकार वसंत प्रकाशने एक सुंदर युद्धगीत दिलं होतं. महंमद रफी आणि कोरसने त्याला स्वर दिला होता. गीताचा मुखडा होता–

धरती मां के वीर सिपाही, जीने मरने आज चले...

आज शम्मी कपूरला त्या चित्रपटाविषयी विचारलं तर ते आपले डोळे मिचकावत मिश्किलपणे म्हणतात, 'कुछ याद नही आ रहा...'

अनेक ऐतिहासिक चित्रपटांतही चांगली समरगीतं सापडतात. *गोवलकोंडा का कैदी* (१९५४) नावाचा चित्रपट होता ही गोष्टी आजच्या पिढीला माहीत नसेल. त्यात प्रेमनाथ आणि राजेन्द्रनाथ या दोघा भावांनी काम केलं होतं. दत्ता डावजेकर आणि जगन्नाथ या दोन संगीतकारांनी अंजानरचित गीतं महंमद रफींकडून गाऊन घेतली होती. त्यातलं ***'शहीदों अमर है तुम्हारी कहानी...'*** आणि ***'उठा के सर चलो जवानों, शान से बढे चलो...'*** ही दोन्ह गीतं लक्षात राहण्याजोगी होती.

चेतक और राणा प्रताप हा असाच एक ऐतिहासिक चित्रपट. ग्रामोफोन रेकॉर्डवर त्याची गीतं *चेतक* नावाने नोंदली गेल्याने फिल्मोग्राफीवरील अनेक पुस्तकांत या चित्रपटाचा उल्लेख नाही. मुजफ्फर शाहजहांपुरी आणि बलराम यांनी लिहिलेल्या गीतांपैकी एक खुर्शीद बावरांनी कोरसबरोबर गायलं होतं. त्याचा मुखडा होता, ***'आज कसोटी बनकर आया देश पे संकट भारी...'***

भरत व्यास यांनी *लाल किला*साठी एक सुंदर समरगीत दिलं होतं. १९६०मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचं दिग्दर्शन महेश भटचे वडील नानाभाई भट यांनी केलं होतं. महंमद रफी आणि सहकलाकारांच्या आवाजातलं हे गीत एस.एन.त्रिपाठींनी संगीतबद्ध केलं होतं– ***'शहीदों की मजारों पर चमकेंगे बनके सितारे, ये अपने वतन पे मरनेवाले...'*** त्या काळात हे गीत तूफान लोकप्रिय ठरलं होतं.

याशिवायची अन्य युद्धगीतं आहेत ***'कर चले हम फिदा जान वतन साथियों अब तुम्हारे हवाले वतन साथियों...'*** (*हकीकत*, संगीत मदन मोहन), ***'यह देश है वीर जवानों का...'***(*नया दौर*, ओ. पी. नय्यर), ***'उस मुल्क की सरहद को कोई छू नही सकता...'***(*आंखे*, रवी), ***'अय मेरे वतन के लोगों'*** (बिनफिल्मी, सी.रामचंद्र) वगैरे गीतांविषयी यापूर्वी 'जी'मधून बरंच लिहून आलेलं आहे. म्हणून त्यांचा उल्लेखच या लेखात करत आहे. स्वातंत्र्यापूर्वीची बरीच गीतं बॉम्बे टॉकीज किंवा न्यू थिएटर्सची होती. नंतर तीच वेगळ्या रंगरूपात पुन्हा चित्रपटात अवतरली. देवेन्द्र गोयलच्या *एक फूल दो माली* (१९६९) मध्ये संगीतकार रवीने महंमद रफीकडून गाऊन घेतलेलं एक गीत होतं–

'चल चल रे नवजवान
जीना तेरा काम नहीं
मरना तेरी शान...'

प्रदीपजींच्या याच मुखड्यावर आधारित हे गीत नवे शब्द लेवून पुन्हा सादर करण्यात आलं होतं. १९६६मध्ये *नेताजी सुभाषचंद्र बोस* नावाचा एक चित्रपट आला होता. त्यात संगीतकार सलील यांनी हेमंतकुमार आणि कोरसच्या आवाजात एक गीत सादर केलं होतं– ***'दुश्मनों सावधान, शत्रुओं सावधान, चल पडे है आज हिन्द के जवान...'***

दादामुनींच्या म्हणण्याप्रमाणे या गीतांवर ज्ञान घोषनी बॉम्बे टॉकीजसाठी बनवलेल्या एका गीताचा प्रभाव होता.

एरव्ही विस्मृतीत गेलेली ही गीतं स्वातंत्र्यदिन किंवा प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने हमखास आकाशवाणी आणि दूरचित्रवाणीवरून आपल्यासमोर येतात. नाहीतर आजच्यासारखं युद्ध भडकल्यावर. एरव्ही शांततेच्या काळात समरगीतांची आठवण कशाला होतेय? ☆